# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ५८८ दिनांक १५/०७/२०२०

१. फिर्यादी पुरुष वय ३५ वर्षे रा. नवघर ता.जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. १३/०७/२०२० रोजी सायंकाळी १७.३० वाजता सुमारास फिर्यादी व आरोपी हे शेजारी राहत असुन फिर्यादी हे शेताचे कामावरुन सायंकाळी घरी आले व आरोपीत यांचेकडे जावुन तुम्ही आमचा जाण्याचा रस्ता का खोदता असे बोलल्यावरुन आरोपी नं.१ याने कोयती घेवुन फिर्यादीचे डोक्यावर तसेच खांद्यावर मारहाण करुन ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच आरोपी नं.२ याने चिकन तोडण्याचे सु-याने फिर्यादीच्या उजव्या हातावर व डाव्या कानावर वार करुन कान तोडुन गंभीर दुखापती केल्या म्हणुन फिर्यादीने आरडा ओरड केल्याने फिर्यादीचा भाऊ भांडण सोडविण्यास आला असता, त्याला आरोपी नं.२ याने पाठीवर सु-याने वार करुन जबर दुखापती करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन <u>**सफाळा पोलीस ठाणे**</u> गु.र.नं.I ४९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०७, ३२५, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक १४/०७/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

२. फिर्यादी महिला वय-४० वर्ष, रा. जव्हार ता.जव्हार, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दिनांक १३/०७/२०२० रोजी सकाळी ०९.३० ते दुपारी ०३.०० वाजेच्या दरम्यान तक्रारदार ह्या कामावर गेलेल्या असतांना त्यांची अल्पवयीन मुलगी वय-१७ वर्षे ०७ महिने हिच्या अज्ञातपणाचा गैरफायदा घेवुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तक्रारदार यांच्या कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे म्हणुन <u>**जव्हार पोलीस ठाणे**</u> गु.र.नं.I १२३/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पोहवा/प्रविण साहेबराव निकम, वय -४३ वर्षे, नेमणुक- विरार पोलीस ठाणे ता. वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दिनांक १४/०७/२०२० रोजी दुपारी १२.३० ते ०१.१५ वाजेच्या दरम्यान वसई -विरार पालीका कार्यालय विरार पुर्व येथे आरोपीत एकत्रीत येवुन मा. जिल्हाधीकारी सो पालघर यांनी यांचे कडील क्र गृह/का/१/टे/३/मनाई आदेश /एस.आर/३३/२० दिनांक ३०/०६/२०२० याचे उल्लंघन केले तसेच आरोपी व त्याचे सोबत असलेले ईतर व्यक्ती यांनी मा.आयुक्त सो वसई विरार महानगर पालीका यांना उद्देशुन घाणेरडया भाषेत शिवीगाळी करुन मा.आयुक्त सो यांच्या दालनाच्या मुख्य दरवाज्यावर कोवीड सेंटरचे छापील चित्रे चिटकवुन सार्वजनीक मालमत्तेचे विद्रुपीकरण केले म्हणुन <u>**विरार पोलीस ठाणे**</u> गु.र.नं.II ६५२/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८, १८९, २९४, म.पो.का. १३५ महाराष्ट्र मालमतेचे विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ कायदा कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पुरुष वय ३१ वर्ष नियुक्ती जव्हार नरपरिषद जव्हार, यांनी फिर्याद दिली की, दिनांक १४/०७/२०२० रोजी दुपारी ०१.०० ते ०१.३० वाजेच्या दरम्यान आरोपीत याने मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन करुन पाच बत्ती नाका समोर रोडलगत गोडया पाण्यातील मच्छिची ग्राहकांना विक्री करत असताना मिळुन आला म्हणुन <u>**जव्हार पोलीस ठाणे**</u> गु.र.नं.II १२४/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९, व साथी चा रोग प्रतिबंधक कलम २,३,४, व आपत्ती व्यवस्थापन अधिनीयम २००५ मधील कलम ५१ (ब)प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

Scanned with CamScanner